# पोलीस आयुक्तालय, सोलापूर शहर.

नवीन प्रशासकीय इमारत, गांधी नगर,
सोलापूर - 413 003.
दुरध्वनी क्र.0217-2744613 फॅक्स क्र. 0217-2744618
Email Id- cp.solapur@mahapolice.gov.in


क्र.कक्ष-2/पोलीस भरती-2021/आरएफआयडी/2022-579 सोलापूर शहर, दि.19-12-2022

विषय :- **पोलीस शिपाई भरती- 2021 आणि**
**चालक पोलीस शिपाई भरती- 2021.**
भरती प्रक्रियेच्या अनुषंगाने मैदानी चाचणीसाठी
सिलबंद दरपत्रके सादर करण्याबाबत.

---**---

आदेश :-

उपरोक्त विषयास अनुसरुन, सोलापूर शहर पोलीस आयुक्तालयाच्या आस्थापनेकरीता पोलीस शिपाई भरती-2021 आणि चालक पोलीस शिपाई 2021 भरती घेण्यात येणार आहे. भरती प्रक्रियेतील उमेदवारांच्या मैदानी चाचणीमध्ये 800 मीटर आणि 1600 मीटर धावणे याची चाचणी आर.एफ.आय.डी. तंत्रज्ञानाचा वापर करुन घ्यावयाची असलेने सदरचे तंत्रज्ञान पुरविणा-या इच्छुक कंपन्याकडून सिलबंद दरपत्रके मागविण्यात येणार आहेत. त्याकरीता सोबत प्रसिध्दीपत्रक जोडले आहे. सदरचे पत्रक हे पोलीस आयुक्तालय सोलापूर शहर येथील संकेतस्थळावर तात्काळ प्रसिध्द करण्यात यावे.

मा.पोलीस उप आयुक्त (मुख्यालय)
यांचे आदेशान्वये.

( पूनम प्रताप शिंदे )
प्र.प्रशासकीय अधिकारी
पोलीस आयुक्त सोलापूर शहर
यांचे करीता.

प्रति,
वरिष्ठ पोलीस निरीक्षक सायबर पोलीस ठाणे, सोलापूर शहर.

# पोलीस आयुक्तालय, सोलापूर शहर.

विषय :- **पोलीस शिपाई भरती- 2021 आणि**
**चालक पोलीस शिपाई भरती- 2021.**
भरती प्रक्रियेच्या अनुषंगाने मैदानी चाचणीसाठी
सिलबंद दरपत्रके सादर करण्याबाबत.

---**---

सोलापूर शहर पोलीस आयुक्तालयाच्या आस्थापनेकरीता पोलीस शिपाई भरती- 2021 आणि चालक पोलीस शिपाई 2021 भरती घेण्यात येणार आहे. सदर दोन्ही भरती करीता सुमारे 13286 आवेदन अर्ज प्राप्त झालेले आहेत. भरती प्रक्रियेतील उमेदवारांच्या मैदानी चाचणीमध्ये 800 मीटर आणि 1600 मीटर धावणे याची चाचणी आर.एफ.आय.डी. तंत्रज्ञानाचा वापर करुन घ्यावयाची आहे. सदरचे तंत्रज्ञान पुरविणा-या इच्छुक कंपन्याकडून दिनांक 23-12-2022 रोजी 16.00 वाजे पर्यंत सिलबंद दरपत्रके मागविण्यात येत आहे.

वरील नमुद कामकाजा संदर्भात खालील नमुद अटी व शर्ती राहतील.

1. पोलीस भरती प्रक्रियेची सेवा ही तातडीची सेवा आहे. यावेळी कोणतीही सुट्टी घेता येणार नाही.
2. आपले कुटुंबातील कोणीही व्यक्ती पोलीस भरती प्रक्रियेत नाही याबाबतचे प्रमाणपत्र देणे आवश्यक आहे.
3. नमुद कामकाज करण्यासाठी कार्यालयाचे ठिकाणी जाण्याचा, येण्याचा व इतर कुठल्याही प्रकारचा खर्चाची जबाबदारी निविदाधारकाची राहील.
4. स्विकृत निविदाकार कंपनी हे नमुद कामकाज स्वत:च करतील. इतर निविदाकारास / कोणतीही दुसरी कंपनीस यांचेकडे नमुद कामकाज देता येणार नाही. तसेच स्विकृत निविदाकार हे त्रयस्थ व्यक्तीस (Thirty Party) सदरचे काम करण्यास नियुक्त करणार नाहीत.
5. या निविदेतील कोणती ही अट रद्द करण्याचा/शिथील करण्याचा किंवा संपूर्ण प्रक्रिया रद्द करण्याचा अथवा पुढे ढकलण्याचा संपूर्ण अधिकार पोलीस आयुक्त सोलापूर शहर यांनी राखून ठेवला आहे.
6. नमुद स्विकृत निविदाकार यांनी देयक या कार्यालयास सादर करतेवेळी सोबत संबंधीत कार्यालयास केलेल्या कामाची मुळ पोच पावती / सर्व्हिस रिपोर्ट असणे आवश्यक आहे. त्यानंतरच देयके पारीत केली जातील.
7. सदर कामाचे होणारे बिल हे पोलीस आयुक्त कार्यालय, सोलापूर शहर यांना पोलीस भरतीचे अनुदान उपलब्ध झाल्यास अदा केले जाईल. सदरचे बिल अदा करताना नियमाप्रमाणे टी.डी.एस. / जी.एस.टी. कपात केला जाईल. परंतु अनुदान वेळीच उपलब्ध न झाल्यास सदर बिलावरती कोणतेही व्याज मागता येणार नाही.
8. विहित मुदतीत/वेळेत काम न केल्यास व तक्रार प्राप्त झाल्यास अथवा असमाधानकार काम केल्यास आवश्यक ती कारवाई करण्याचे हक्क पोलीस आयुक्त सोलापूर शहर यांचेकडे राहतील.
9. स्विकृत पुरवठादाराने दराबाबत व कामकाजाबाबत पोलीस आयुक्त कार्यालय, सोलापूर शहर यांचे बरोबर रु.100/- स्टॅम्प पेपरवर नोटरीद्वारे करार करणे आणि सदर कराराचा खर्च हा संबंधीत निविदाधारकाने करणे बंधनकारक आहे.
10. सिलबंद दरपत्रकावर पोलीस भरती-2021 असे नमुद करुन पोलीस आयुक्तालय सोलापूर शहर कार्यालय येथील बारनिशी विभाग येथे कार्यालयीन वेळेत सिलबंद दरपत्रके सादर करावेत.

मा.पोलीस उप आयुक्त (मुख्यालय)
यांचे आदेशान्वये.

( पूनम प्रताप शिंदे )
प्र.प्रशासकीय अधिकारी
पोलीस आयुक्त सोलापूर शहर
यांचे करीता.